आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 08/07/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 150 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# आरटीओतील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी

## दोषींवर कठोर कारवाई केली जाईल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) विभागातील कथित गैरव्यवहार, कर चुकवेगिरी आणि अनियमिततांच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.**




सदस्य विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासंदर्भात परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली असून, सभागृहातील सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महागड्या लक्झरी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात काही प्रकरणांमध्ये कर चुकवेगिरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही वाहनमालक महाराष्ट्रात वास्तव्यास असून राज्यातील बँकांकडून कर्ज घेत असतानाही वाहनांची नोंदणी मात्र दादरा-नगर हवेली, दमण-दीव, पुदुच्चेरी आदी ठिकाणी केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. अशा प्रकारांवर आरटीओकडून कारवाई सुरू आहे.

भविष्यात कर चुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी पडताळणी तसेच कर्ज व रहिवासाशी संबंधित कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात येईल.आरटीओ विभागासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी, ध्वनिचित्रफिती आणि अन्य आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकारी प्रियंका नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. या त्रिसदस्यीय समितीत अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड आणि दक्षता अधिकारी मंदार जावळे यांचा समावेश आहे. या समितीला एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# राज्यात पुढील पाच दिवस वादळी पावसाचा इशारा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : मुंबई वेधशाळेने राज्यासाठी पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, विविध भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.7 जुलै रोजी पालघर, नाशिक घाट आणि पुणे घाट परिसरासाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे.**



7 जुलै रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड,कोल्हापूरघाट,अहिल्यानगर, धुळेजळगाव, वाशीम आणि वर्धा, नागपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ठाणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, बुलडाणा, अकोला, सातारा घाट आणि अमरावती येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

8 जुलै रोजी पालघर, नाशिक घाट, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर घाट, बुलडाणा, अकोला, अमरावती आणि वर्धा येथे यलो अलर्ट राहणार असून, पुणे घाट आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट असेल.

9 जुलै रोजी रत्नागिरी, सातारा घाट, पुणे घाट, खंडाळा घाट, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.

10 जुलै रोजी वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट कायम राहणार आहे.

11 जुलै रोजी अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.

मुंबई वेधशाळेने नागरिकांनी स्थानिक प्रशासन व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 08/07/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी उन्नती सोशल फाउंडेशनची तत्पर धाव

## • सुमारे 250 नागरिकांना अन्न, पिण्याचे पाणी, ब्लँकेट, बिस्किटे व जीवनावश्यक साहित्याचे वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पवना नदीच्या वाढत्या पाणीपातळीमुळे पिंपळे सौदागर व रहाटणी परिसरातील अनेक कुटुंबांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले. या आपत्कालीन परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत उन्नती सोशल फाउंडेशनने तातडीने मदतीचा हात पुढे करत पूरग्रस्त नागरिकांना अन्न, पिण्याचे पाणी, नाश्ता, ब्लँकेट, बिस्किटे तसेच अन्य आवश्यक साहित्याचे वाटप केले.**



रहाटणी परिसरातील सुमारे 200 नागरिकांना महानगरपालिका प्राथमिक शाळा, रहाटणी (मुले व मुली शाळा क्र. 55) येथे, तर पिंपळे सौदागर परिसरातील सुमारे 50 नागरिकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्राथमिक शाळा क्र. 51 (आण्णासाहेब मगर माध्यमिक विद्यालय परिसर) येथे सुरक्षितपणे स्थलांतरित करण्यात आले होते. या दोन्ही ठिकाणी उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने सकाळचा नाश्ता, पिण्याचे स्वच्छ पाणी, ब्लँकेट, बिस्किटे तसेच आवश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले.

यावेळी नगरसेविका तथा उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कुंदाताई संजय भिसे, संस्थापक संजय तात्याबा भिसे यांनी स्वतः शाळांमध्ये भेट देऊन पूरग्रस्त नागरिकांची विचारपूस केली. नागरिकांना धीर देत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच प्रशासनाकडून सुरू असलेल्या मदतकार्यालाही सहकार्य केले.

फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवक यांनी मदतकार्यामध्ये सक्रिय सहभाग घेत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली.

उन्नती सोशल फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून, नैसर्गिक आपत्तीच्या काळात गरजूंना तातडीने मदत पोहोचविण्याची परंपरा संस्थेने कायम राखली आहे. पूरग्रस्त नागरिकांना केवळ साहित्याची मदत नव्हे, तर मानसिक आधार व सुरक्षिततेची भावना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमात मागील संकल्पना विशद करताना फाउंडेशनचे अध्यक्षा तथा नगरसेविका डॉ.सौ.कुंदा ताई संजय भिसे म्हणाल्या, "नैसर्गिक आपत्ती कोणालाही सांगून येत नाही. अशा वेळी समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांच्या मदतीला धावून जाणे, हीच खरी माणुसकी आहे. उन्नती सोशल फाउंडेशन नेहमीच संकटग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे आणि पुढेही राहील. पूरग्रस्त नागरिकांना तातडीने अन्न, पिण्याचे पाणी, ब्लँकेट व आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यामागील आमचा उद्देश त्यांना संकटाच्या काळात आधार देण्याचा होता. समाजातील प्रत्येकाने शक्य त्या स्वरूपात मदतीचा हात पुढे केल्यास कोणतेही संकट आपण एकजुटीने पार करू शकतो. नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सुरक्षित राहावे, असे आवाहनही मी सर्वांना करते."

# थेरगावमध्ये कोयत्यासह तरुण ताब्यात

## गंभीर गुन्ह्याच्या तयारीचा संशय

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : युनूस खतीब**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत लागू असलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करत धारदार कोयता बाळगणाऱ्या एका तरुणाला गुन्हे शाखेच्या पथकाने थेरगाव येथे ताब्यात घेतले. याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, 6 जुलै रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास काळेवाडी स्मशानभूमीजवळ गुन्हे शाखा युनिट-2च्या पथकाने कारवाई केली. यावेळी समीर शराफत उस्मानी (वय 20, रा. जगतापनगरजवळ, थेरगाव) हा धारदार लोखंडी कोयता बाळगून संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला.

पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या 14 दिवसांच्या प्रतिबंधात्मक आदेशादरम्यान शस्त्रे बाळगण्यास बंदी असतानाही आरोपी कोयत्यासह फिरत होता.

त्याच्याकडे कोयता आढळल्याने तो एखादा गंभीर दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

याप्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास काळेवाडी पोलीस करीत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 08/07/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मोशीत एका रात्रीत दोन दुकानांवर डल्ला

## 41 हजारांची रोकड लंपास, तिघांविरोधात गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : युनूस खतीब**

**मोशीतील बोराडेवाडी परिसरात चोरट्यांनी एका रात्रीत दोन दुकानांचे शटर उचकटून 41 हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.**

**याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, 6 जुलै रोजी पहाटे 2 ते 3 वाजण्याच्या सुमारास रिद्धी सिद्धी ट्रेडिंग कंपनी व कृष्णाई दूध डेअरी या दुकानांचे शटर उचकटून आरोपींनी आत प्रवेश केला. दुकानातील काउंटरच्या ड्रॉवरमधील रोकड चोरून नेण्यात आली. या चोरीत एकूण 41 हजार रुपयांचा ऐवज लंपास झाला.

याप्रकरणी प्रदीप सुरेश शेळके (वय 52, रा. बोराडेवाडी, मोशी) यांनी फिर्याद दिली आहे.

त्यानुसार विश्वजित बाळासाहेब जाधव (19), विवेक विनोद राम (19) यांच्यासह यश पवार (पूर्ण नाव व पत्ता अज्ञात) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम 305, 331(4), 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास एमआयडीसी भोसरी पोलीस करीत आहेत.

# पूरपरिस्थितीत महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे युद्धपातळीवर बचावकार्य

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे विविध भागांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग नागरिकांच्या मदत व बचावकार्यासाठी अहोरात्र कार्यरत आहे. शहरातील विविध भागांमध्ये अडकलेल्या नागरिकांसह जनावरांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरु असून, विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हे बचावकार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यात आले.**



अतिवृष्टीमुळे रहाटणी, केशवनगर, ताथवडे, किवळे, रावेत, मोशी, चिखली, रमाबाई नगर, भाट नगर, आंबेडकर नगर, नढे नगर, पिंपळे गुरव, नवी सांगवी, भोसरीतील कुंदननगर तसेच शहरातील अन्य पूरग्रस्त अशा सुमारे 20 ते 25 भागांमध्ये नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. या ठिकाणी अग्निशमन विभागाच्या जवानांनी बोटींच्या सहाय्याने सुमारे 1,500 नागरिकांची सुखरूप सुटका करून त्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित केले.

याशिवाय, चिंचवड येथील केशवनगर परिसरातील गुरुकुलमध्ये अडकलेल्या तब्बल 300 विद्यार्थ्यांचे यशस्वी बचावकार्य करून त्यांना सुरक्षित निवारा केंद्रात हलविण्यात आले. नदीकाठच्या मंदिरांमध्ये वाढत्या पाण्याच्या प्रवाहामुळे अडकलेल्या पुजाऱ्यांचीही सुखरूप सुटका करण्यात आली. ताथवडे परिसरात अडकलेल्या वयोवृद्ध नागरिकांना सुरक्षित बाहेर काढून निवारा केंद्रात हलविण्यात आले. काळेवाडी येथे गर्भवती महिला, लहान मुले तसेच अनेक वयोवृद्ध नागरिकांना सुरक्षितस्थळी पोहोचविण्यात आले, तर जुनी सांगवी परिसरात पूराच्या पाण्यात अडकलेल्या आई आणि तिच्या बाळाची धाडसीपणे सुखरूप सुटका करण्यात आली.

पूरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या एकूण सुमारे 5,000 नागरिकांना महानगरपालिकेच्या शाळांमध्ये उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यात आले असून, तेथे त्यांच्यासाठी भोजन, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांप्रमाणेच अतिवृष्टीमुळे पुरात अडकलेल्या गाई, म्हशी आदी सुमारे 750 जनावरांनाही सुरक्षितपणे बाहेर काढण्यात अग्निशमन विभागाला यश आले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व 10 अग्निशमन केंद्रांवरील अधिकारी, जवान आणि नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वय, तत्परता आणि धाडसाच्या बळावर ही आपत्कालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळली. या संपूर्ण बचाव मोहिमेत उप अग्निशमन अधिकारी अनिल टिंबळे, दिलीप गायकवाड, सुनील फरांदे, श्रीकांत वैरागर, गौतम इंगवले, चंद्रशेखर घुले यांच्यासह लिडिंग फायरमन अनिल कदम, वरिष्ठ फायरमन चेतन माने तसेच फायरमन सुमित कांबळे, शुभम किरवे, दर्शन सोनवणे, संतोष सरोटे, नामदेव वाघे, ड्रायव्हर-ऑपरेटर अमोल चिपळुनकर आणि इतर अग्निशमन जवानांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 08/07/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# पिंपरी-चिंचवडमधील पाणी तुंबण्यावर कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी

## नैसर्गिक जलप्रवाहांचे संवर्धन करण्याची विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहरात दरवर्षी पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी तुंबण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नैसर्गिक जलप्रवाह, नाले-ओढे आणि पाणी मुरण्याच्या व्यवस्थेचे संवर्धन करण्याची मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे.**



यासंदर्भात प्रसिद्ध केलेल्या निवेदनात भोईर यांनी म्हटले आहे की, अल्पकालीन पाऊस झाला तरी शहरातील प्रमुख रस्ते, चौक, महामार्ग तसेच निवासी भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका, नागरिकांची गैरसोय आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत आहे. ही समस्या केवळ मुसळधार पावसामुळे नव्हे, तर नैसर्गिक जलप्रवाहांवरील अतिक्रमणे आणि अनियोजित शहरीकरणामुळे निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.पूर्वी रस्त्यांच्या कडेला असलेले मातीचे चर, नैसर्गिक नाले, ओढे आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरविणाऱ्या खुल्या जागा मोठ्या प्रमाणावर नष्ट झाल्या आहेत. वाढते काँक्रीटीकरण, पेव्हिंग ब्लॉकचा अतिवापर, अनियंत्रित बांधकामे आणि नैसर्गिक जलमार्गांवरील अतिक्रमणांमुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता थेट रस्त्यांवर साचत असल्याने जलनिस्सारण यंत्रणेवर अतिरिक्त ताण येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.भोईर यांनी महानगरपालिकेकडे शहरातील सर्व नैसर्गिक नाले, ओढे, तलाव आणि पावसाच्या पाण्याच्या प्रवाहांचे वैज्ञानिक सर्वेक्षण व मॅपिंग करून त्यांचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याची मागणी केली आहे. तसेच नवीन विकासकामे, रस्ते आणि गृहप्रकल्पांना मंजुरी देताना नैसर्गिक जलप्रवाह अबाधित राहतील, याची सक्तीने अंमलबजावणी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.याशिवाय रेन वॉटर रिचार्ज झोन, जैविक जलनिस्सारण व्यवस्था (बायो-स्वेल्स), खुल्या मातीच्या जागा आणि पर्यावरणपूरक जलव्यवस्थापन उपायांना प्राधान्य देण्याचीही त्यांनी सूचना केली आहे.

शहराचा विकास हा केवळ रस्ते आणि उड्डाणपूल उभारण्यात नसून पर्यावरणीय संतुलन, जलव्यवस्थापन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनातही असल्याचे सांगत, भविष्यातील शहरी पूर, भूजल पातळीतील घट आणि पर्यावरणीय हानी टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने व्यापक व दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे.

# कोविड काळात सुरू केलेला 'डॅशबोर्ड' पुन्हा सुरू करा-डॉ.नीलम गोऱ्हे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांना दिलेल्या सवलतीच्या बदल्यात 15 टक्के खाटा राखीव ठेवण्याच्या अटींचे पालन होत नसल्याच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात विधानपरिषद सदस्य ॲड. अनिल परब यांनी प्रश्न क्र. 9058 अंतर्गत, बृहन्मुंबई मधील ग्लोबल रुग्णालयाकडून या अटींचे पालन होत नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केला.**




या चर्चेत सहभागी होत शिवसेना नेत्या व विधानपरिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रुग्णांना खाटांची तत्काळ माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी कोविड काळात सुरू केलेला डिजिटल डॅशबोर्ड पुन्हा सुरू करण्याची मागणी केली.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, कोविड काळात जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या डॅशबोर्डमुळे कोणत्या रुग्णालयात किती खाटा उपलब्ध आहेत, याची माहिती नागरिकांना आणि प्रशासनाला एका क्लिकवर मिळत होती.

त्याच धर्तीवर महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांनी समन्वय साधून नव्याने डॅशबोर्ड विकसित करावा.

महानगरपालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र असे दोन डॅशबोर्ड कार्यान्वित केल्यास रुग्णांना तातडीने माहिती मिळेल, तसेच उपलब्ध खाटांचा पारदर्शक हिशोबही ठेवता येईल,

असे डॉ. गोऱ्हे यांनी सभागृहात नमूद केले.या चर्चेला उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी,

अशा प्रकारचा डॅशबोर्ड विकसित करण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या जातील, असे सकारात्मक आश्वासन सभागृहात दिले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968